**मोटर अपघात अर्ज क्र.०३/२०२१**
**सीएनआरक्र.एमएचडब्ल्यूआर११०००१२१२०२१**
**रेखा वि. गजानन व इतर**

**आदेश नि. क्र. ३८ वर पारित**
**(पारीत दिनांक ०१.०८.२०२६)**

अर्ज व त्यावरील विमा कंपनीचे म्हणणे, व प्रकरणाचे अवलोकन केले. उभय पक्षाचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदाराने दोषारोपपत्रातील पोलिसांनी दिलेली साक्षांकित प्रत दाखल केली आहे. विमा कंपनीचे वि.वकीलांचे असे म्हणणे आहे की, ती नियमाप्रमाणे प्रमाणीत नसून उशीराने दाखल केली आहे. त्याला निशानी देता येणार नाही.

३. दोषारोपाची प्रत पोलिसांनी सहीशिक्कयासह दिलेली आहे, याबाबत वाद दिसुन येत नाही. त्यावर सत्यप्रतीबाबत आवश्यक नोंदी नाहीत. मात्र त्या दस्ताचे खरेपणाबाबत कोणतेही वाद दिसुन येत नसून, ते सार्वजनिक दस्त आहेत. त्याची प्रत अर्जदाराला शासकीय विभाग यांचेकडून प्राप्त झालेली आहे.

४. सबब अर्ज मंजूर. सदर दोषारोपपत्रास निशानी देण्यात येते. विमा कंपनीस ते खोडून काढण्याकरीताचा पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात येते.

DHANRAJ YASHWANT KALE
Digitally signed by DHANRAJ YASHWANT KALE
Date: 2026.08.01 16:55:41 +0530

दि.०१.०८.२०२६

(धनराज य. काळे)
सदस्य,
मोटार अपघात न्यायाधिकरण,
हिंगणघाट, जि. वर्धा.

मो.अ. अर्ज क्र.०३/२०२१

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word, as per the assigned order.

Vidyadhar Bokde
Stenographer (Grade-I)